पं.दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

## श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

# राज्यशास्त्र विभाग

# वार्षिक अहवाल

## २०१७—२०१८

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

## प्रा.डॉ.आर.व्हि.लोमटे

# राज्यशास्त्र विभाग – वार्षिक अहवाल २०१७–२०१८

## Annual Departmental Profile of Political Science

1. **Faculty and Their Position:-**

| Name | Qualification | Designation | Specialization | Date of Joining & Experience | Position |
|---|---|---|---|---|---|
| Lomte R.V. | M.A. SET, Ph.D | Assistant Professor | Political Theory | 03/10/2003 Thirteen Years | Full Time |
| Lahane B.C. | M.A. | Assistant Professor | ------ | August 2017 | CHB |

2. **Paper Distribution and workload per week-Year 2017-18**

| Name of Faculty | Class | Paper name and Number | Number of Periods | Total Periods |
|---|---|---|---|---|
| Lomte R.V. | BAFY<br>BASY<br>BATY<br>BATY<br>BATY<br>BATY | Basic Concepts of Political Science-101,103<br>International Relations-106,108<br>Indian Political Thinkers-109,112<br>Western Political Thinkers-110,113<br>Political Ideology-111,114<br>Project | 04<br>04<br>04<br>04<br>04<br>04 | 24 |
| Lahane B.C | BAFY<br>BASY | Govt.& Politics of Maharashtra-102,104<br>Govt. & Politics of India -105,107 | 04<br>04 | 08 |

3. **Student Profile:- 2017-18**

| Class | **Total Students** | **Gender** | | **Category** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Male | Female | SC | ST | OBC | NT | Minority | GEN |
| BAFY | **57** | 43 | 14 | 06 | 00 | 05 | 10 | 00 | 36 |
| BASY | **19** | 11 | 08 | 04 | 00 | 03 | 05 | 00 | 07 |
| BATY | **17** | 06 | 11 | 00 | 00 | 05 | 02 | 00 | 10 |
| Main | **5** | 01 | 04 | 00 | 00 | 02 | 01 | 00 | 02 |

4) **Departmental Time Table-2017-18 Political Science FIRST SEMISTER**

| Day Time | class | 10.50-11.40 | 11.40-12.30 | 12:30-01:20 | 01:20-01:40 | 01.40-02:30 | 02.30-03:20 | 03.20-04:10 | 04.10-05:00 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MON | B.A.I | | | | | POL P-II F2 BCL | | | |
| | B.A.II | | | | | | POL P-V F2 BCL | | POL P-VI F2 RVL |
| | B.A.III | | | POL P-IX F2 RVL | | MAIN-P-XI G9 RVL | | POL-P-IX F2 RVL | |
| TUE | B.A.I | | | | | POL P-II F2 BCL | | | |
| | B.A.II | | | | | | POL P-V F2 BCL | | POL P-VI F2 RVL |
| | B.A.III | | | POL P-IX F2 RVL | | MAIN P-XI G9 RVL | | POL P-IX F2 RVL | |
| WED | B.A.I | | | | I | POL P-II F2 BCL | | | POL P-I F2 RVL |
| | B.A.II | | | | N | | POL P-V F2 BCL | | |
| | B.A.III | | | POL P-X F2 RVL | T E | MAIN P-XI G9 RVL | | | |
| THU | B.A.I | | | | R | POL P-II F2 BCL | | | POL P-I F2 RVL |
| | B.A.II | | | | V | | POL P-V F2 BCL | | |
| | B.A.III | | | POL P-X F2 RVL | A | MAIN P-XI G9 RVL | | | |
| FRI | B.A.I | | POL P-I F2 RVL | | L | | | | |
| | B.A.II | | | | | | POL P-VI F2 RVL | | |
| | B.A.III | | | POL P-X F2 RVL | | PROJECT F2 RVL | | PROJECT F2 RVL | |
| SAT | B.A.I | | POL P-I F2 RVL | | | | | | |
| | B.A.II | | | | | | POL P-VI F2 RVL | | |
| | B.A.III | | | POL P-X F2 RVL | | PROJECT F2 RVL | | PROJECT F2 RVL | |

**RVL - Lomte Ramkishan Vasantrao BCL – Babasaheb Chhaburao Lahane**

**H.O.D. Political Science**
**Dr. Lomte R. V.**

**Principal**
**Dr. S.R.Takle**

## विभागातील उपक्रमांचा अहवाल

### १) युवक नेतृत्व विकास शिबिर :—

महाविद्यालयीन युवकांमध्ये नेतृत्व गुण विकासीत व्हावेत, या उद्देशाने राज्यशास्त्र विभागाच्या वतीनेएकदिवशीय युवक नेतृत्व विकास शिबीर आयोजित करण्यात आले. दि. ८ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात हे शिबिर संपन्न झाले.शिबिराचे उद्घाटन दुपारी १२:३० वाजता झाले. उद्घाटक व बीजभाषक म्हणून प्रा. डॉ. आश्रुबा गवळी, शिव छत्रपती महाविद्यालय औरंगाबाद हे उपस्थित होते. व्यासापीठावर वक्ते म्हणून प्रा. डॉ. कैलास इंगळे, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री, प्रा. विजय पांडे (प्रस्तुत महाविद्यालय) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुभाष टकले सर उपस्थित होते. डॉ. आश्रुबा गवळी यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर बीजभाषक दिले. त्यानंतर उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. कैलास इंगळे यांनी 'संभाषण कौशल्य व नेतृत्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तिसऱ्या सत्रात प्रा. विजय पांडे यांनी 'वेळेचे व्यवस्थापन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.चौथे सत्र विद्यार्थ्यांनी गटचर्चा घेण्यात आली. 'आदर्श नेतृत्व' याविषयी विद्यार्थ्यांना चर्चा केली. आपली मते व्यक्त केली. चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. शेवटी बी.ए.तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. निशा पांचाळ यांनी आभार मानले.

### २) भिंतीपत्रक प्रकाशन :—

दि.१७ सप्टेंबर २०१७ रोजी राज्यशास्त्र विषयाचे'भारतातील घटकराज्यांनी पुनर्रचना' या शिर्षकाच्या भिंतीपत्रकाचे प्रकाशन प्रा. काकासाहेब डक व उपप्राचार्य डॉ. पांडूरंग कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले. 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' कार्यक्रमाच्या वेळी हे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनाच्या प्रसंगी राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांच्यासह विद्यार्थी श्री. निवृती गाडेकर, कु. सरला दाढे, श्री सहाने हे विद्यार्थी उपस्थित होते.सदरील विद्यार्थ्यांनी हे भिंतीपत्रक बनविले होते.

### ३) अतिथी व्याख्यान :— (प्रथम सत्र)

दि. २२/०९/२०१७ रोजी राज्यशास्त्र विभागात प्रा. डॉ. आर. के. पवार (शिवाजी महाविद्यालय कन्नड) यांचे 'नागरिकत्व आणि हक्क' या विषयावर अतिथी व्याख्यान झाले.

### ४) विद्यार्थी चर्चासत्र :—

दि. २६/०९/२०१७ रोजी 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ' या विषयावर राज्यशास्त्र विभागात विद्यार्थ्यांचे चर्चासत्र घेण्यात आले. मुख्यमंत्र्याची निवड मंत्रीमंडळ निर्मिती या विषयी चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

### ५) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती :—

महाविद्यालय दि. २ ऑक्टो. २०१७ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती राज्यशास्त्र विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील कर्मचारी श्री. बाबासाहेब दाभाडे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी 'महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे विचार व कार्य' याविषयी आपले विचार मांडले.

### ६) महात्मा गांधी व्याख्यानमाला :—

डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद अंतर्गत विद्यार्थी विकास विभाग व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री. यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातदि. ११ जानेवारी २०१८ रोजी 'महात्मा गांधी व्याख्यानमाला' संपन्न झाली. व्याख्यानमालेसाठी उद्घाटक व बीजभाषक म्हणून श्री. ज्ञानप्रकाश मोदानी हे उपस्थित होते. वक्ते म्हणून प्रा. डॉ. सुनिल पिंपळे (लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद) हे उपस्थित होते. व्याख्यानमालेचे उद्घाटन सकाळी ११ वाजता ज्ञानप्रकाश मोदीनी यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी बीजभाषण दिले. सद्यस्थितीत मानवी समाजासमोर अनेक समस्या आहेत. महात्मा गांधीचे विचार हे या समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त आहेत. गांधीजींचा विचार हा जीवनांचा एक मार्ग आहे. त्याच्या मार्गाने जीवन जगल्यास आंनद मिळतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.त्यानंतर प्रा. सुनिल पिंपळे यांनी महात्मा गांधीच्या विचारावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गांधीजींचे विचार उपयुक्त आहेत. परंतू ते विचार प्रत्यक्षव्यवहारात आणले जात नाहीत, असे आढळते. लोकांनी गांधीजीच्या विचारानुसार वागल्यास अनेक समस्यापासुन मुक्ती मिळले, असे मत त्यांनी व्यक्त केले. व्याख्यानमालेचा अध्यक्षीय समारोप प्राचार्च डॉ. सुभाष टकले यांनी केला. विद्यार्थ्यांना व्याख्यानमालेतून ऐकायला मिळालेले विचार उपयुक्त ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ७) अभ्यास सहल :—

राज्यशास्त्र विभागाची अभ्यास सहल दिनांक: २७/०२/२०१८ रोजी मौजे 'पाल' तालुका फुलंब्री येथे काढण्यात आली. **पाल ग्रामपंचायतीची रचना व कार्य** याचा अभ्यास या सहलीत करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्यांसोबत चर्चा करण्यात आली.

## ८) अतिथी व्याख्यान :— (दुसरे सत्र)

दि. ५ मार्च २०१८ रोजी द्वितीय सत्रातील अतिथी व्याख्यान राज्यशास्त्र विभागात झाले. प्रा. किशोर काळे, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी 'भारतीय लोकशाही पुढील आव्हाने' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## ९) भिंतीपत्रक प्रकाशन :—

द्वितीय सत्रातील भिंतीपत्रकाचे प्रकाशन अतिथी व्याख्यान देण्यासाठी आलेल्या प्रा. किशोर काळे यांच्या हस्ते केले. ' भारताच्या राज्यघटनेतील मुलभुत अधिकार' या शिर्षकाचे भिंतीपत्रक राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी बनविले होते.

## १०) प्रकल्प सादरीकरण :—

बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मुख्य विषयाच्या प्रकल्याचे सादरीकरण दि. १२/०३/२०१८ रोजी घेण्यात आले. परिक्षक म्हणून प्रा. किरण धनेधर (राजर्षी शाहू महा. पाथ्री) हे उपस्थित होते.

**सादरकर्ते**

**डॉ.आर.व्ही.लोमटे**

# कार्यक्रम फोटो




युवक नेतृत्व विकास शिबीर उद्घाटन, प्रा. डॉ. आश्रुबा गवळी,प्रा. डॉ. कैलास इंगळे व मान्यवर.




युवक नेतृत्व विकास शिबीर प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.रामकिशन लोमटे




युवक नेतृत्व विकास शिबीर व्याख्यान देताना प्रा. डॉ. आश्रुबा गवळी




युवक नेतृत्व विकास शिबीर व्याख्यान देताना प्रा. डॉ. कैलासइंगळे




राज्यशास्त्राच्या भिंतीपत्रकाचे प्रकाशन प्रा. काकासाहेब डक व उपप्राचार्य डॉ. पांडूरंग कल्याणकर, प्रा. डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने श्री. निवृती गाडेकर, कु. सरला दाढे, श्री सहाने.




राज्यशास्त्र विभागात अतिथी व्याख्यान देताना प्रा. डॉ. आर. के. पवार (शिवाजी महा. कन्नड)




महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती श्री बाबासाहेब दाभाडे




'महात्मा गांधी व्याख्यानमालावक्ते श्री. ज्ञानप्रकाश मोदानी प्रा. डॉ. सुनिल पिंपळे




राज्यशास्त्र विभागाची अभ्याससहल, पाल येथील सरपंच व सदस्यांची चर्चा




राज्यशास्त्र विभागाची अभ्यास सहल




राज्यशास्त्र विभागात अतिथी व्याख्यान देताना प्रा.किशोर काळे




राज्यशास्त्र विभागात अतिथी प्रा.किशोर काळे यांच्या हस्ते भिंतीपत्रक प्रकाशन केले

दैनिक
पुण्यनगरी
दिनांक : ०१.०१.२०१७

# चांगले व्यक्तिमत्त्व काळाची गरज -डॉ. अश्रुबा गवळी

फुलंब्री / प्रतिनिधी

समाजात एक चांगला व्यक्ती म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी आपले व्यक्तिमत्त्व चांगले बनविणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येकाने स्वतः च्या विविध पैंलूचा बारकाइने अभ्यास करणे गरजेचे असल्याचे मत डॉ. अश्रुबा गवळी यांनी केले.

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने युवक नेतृत्व विकास शिबीर व सामाजिकशास्त्रे अभ्यासमंडळाचे उद्घाटन डॉ. अश्रुबा गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी' व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर ते बोलत होते. स्वतःला पूर्णपणे व्यक्त होता आले पाहिजे. स्वतःमध्ये असणाऱ्या विविध पैलूंना विकसित करता आले पाहिजे. चांगले काय आणि वाईट काय हे ओळखता आले पाहिजे. त्याशिवाय व्यक्तिमत्त्व विकास होणार नाही. यासोबतच दृष्टीकोण, वर्तन, ध्येय, चारित्र्य, स्वभाव अशा विविध पैलूंवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या या पहिल्या सत्राचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर. टकले यांनी केला. शिबिराच्या दुसऱ्या सत्रात 'संभाषण कौशल्य व नेतृत्व' या विषयावर राजर्षी शाहू महाविद्यांलयातील मराठी विभाग प्रमुख, डॉ. कैलास इंगळे यांनी मार्गदर्शन केले. तर तिसऱ्या सत्रात 'वेळेचे व्यवस्थापन' इतिहास विभाग प्रमुख, प्रा. विजय पांडे यांनी विध्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रामकीसन लोमटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली पवार व सरला दाढे या विद्यार्थिनींनी केले.



संत सावळा महाविद्यालयात शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. अश्रुबा गवळी.

पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## समाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ

## वार्षिक अहवाल २०१७–१८

सादरकर्ते

डॉ.आर.व्ही.लोमटे

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## समाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ

## वार्षिक अहवाल २०१७–१८

### १) उद्घाटन :–

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मधील सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन दि. ८ सप्टेंबर २०१७ रोजी प्रमुख अतिथीप्रा. डॉ. आश्रुबा गवळी,शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या हस्ते करण्यात आले.प्रा.डॉ.आश्रुबा गवळी यांनी या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्यास्थापणेचा उद्देश स्पष्ट केला.समाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचाअध्यक्ष म्हणून बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री निवृती गाडेकर व उपाध्यक्ष म्हणून श्री सोमीनाथ सहाणेयांचे स्वागत करण्यात आले.

### २) भिंतीपत्रक प्रकाशन :–

दि.२ ऑक्टो. २०१७ रोजी सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने कु. सरला दाढे या विद्यार्थीनीने बनविलेले ‘स्वच्छ भारत’ या विषयावरील भिंतीपत्रक महात्मा गांधी जयंती कार्यक्रमात प्रकाशित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे वक्ते श्री बाबासाहेब दाभाडे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांच्यासह सामाजिकशास्त्राचे विद्यार्थी उपास्थित होते.

### ३) लोकशाही पंधरवडा :–

महाराष्ट्र शासनाने २६ जाने २०१८ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या त्यानुसार लोकशाही विषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने ‘लोकशाही व्यवस्थेची ओळख’ या विषयावर डॉ. रामकिशन लोमटे व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. याबरोबरच ग्रंथलयाशेजारील फलकावर ‘मतदान यादीत नाव नोंदणी करा व भारतीय लोकशाही मजबूत करा’ अशा आशयाची सूचना विद्यार्थ्यांसाठी लावण्यात आली.

## ४) सामान्य ज्ञान चाचणी :—

दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी सामान्य ज्ञान चाचणी घेण्यात आली. या उपक्रमात एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## ५) भिंतीपत्रक प्रकाशन :—

समाजिकशास्त्रांचे 'महिलांचे हक्क' या विषयावर बनविलेले भिंतीपत्रक दि.०५/०३/१८ रोजी प्रा. किशोर काळे, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद यांच्या हस्ते प्रकाशित केले.अतिथी व्याख्यान देण्यासाठी आलेल्या प्रा. किशोर काळे महाविद्यालयात उपस्थित होते.

कार्यक्रमफोटो




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन—अतिथींच्या हस्ते पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन—संचलन करताना विद्यार्थी




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे प्रथम सत्रातील भिंतीपत्रक प्रकाशन




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे द्वितीय सत्रातील भिंतीपत्रक प्रकाशन

सादरकर्ते

डॉ.आर.व्ही.लोमटे